ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – IV July – August 2023

Original Research Article

# महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री शिक्षणा विषयी कार्य

**प्रा. सोनजे निलेश बापू**

*कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय शिरसोंडी, ता-मालेगाव, जि- नाशिक*

**प्रस्तावना:**

सध्याच्या मालेगाव तालुक्यातील कवळाने गावाच्या काशीराव गायकवाड पाटलांचा दहा-बारा वर्षांचा गोपाळ योगायोगाने संधी मिळून बडोदा येथील राजघराण्यात दत्तक पुत्र म्हणून गेला आणि तिथे राज्याभिषेक (२७ मे १८७५) होऊन सयाजीराव तिसरे म्हणून महाराजा बनले.

**Copyright © 2023 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

शिक्षणाशी संबंध नसलेले सयाजीराव कर्म-धर्मसंयोगाने बडोद्याचे राजे बनले. पण त्यांचे व्यक्तिमत्व योग्य ते बनवण्याचे कार्य केले ते एका ब्रिटिश आयरिश आय.सी.एस. असलेल्या एका अधिकाऱ्याने विदर्भात शिक्षण विभागाचे एक मोठे अधिकारी असलेले मी.एफ.ए.एच. इलियट यांची बडोदा येथील राज घराण्यातील मुलांसाठी असलेल्या स्कूलचे प्राचार्य म्हणून नेमणूक झाली. इलियट यांचे वडील मद्रास येथे गव्हर्नर होते. एवढी मोठी पार्श्वभूमी असलेल्या या शिक्षण संचालकाने महाराजांच्या शिक्षणाची जबाबदारी घेतली. आपल्या गुरूंच्या व्यक्तिमत्वाची छाप सयाजीरावांवर पडत गेली. संबंध दृढ होत गेले. दोघांमध्ये आदर आणि जिव्हाळा वाढत गेला.

महाराजांमध्ये हळू-हळू शिक्षणासोबतच आपल्या संस्थानामधील उनिवा आपल्या संस्थानांमध्ये नवनवीन प्रयोग करण्याच्या कल्पना शिक्षणाबद्दल जिज्ञासा, इतिहासाबद्दल आवड आणि प्रशासनातील दृढ दूरदृष्टी विकसित होण्यास सुरुवात झाली. पुढे हे शिक्षण सुरू असतानाच. राज्याभिषेकानंतर सुमारे सहा वर्षानंतर सयाजीराव १८ वर्षांचे झाल्यानंतर लगेचच २८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीराव महाराजांना राज्याधिकार सोपवले गेले. आणि संस्थानात एक सामाजिक आर्थिक राजकीय विकासाला वेग येण्यास सुरुवात झाली.

राज्यकारभार हाती आल्यानंतर अल्पावधीतच आपल्या कार्यामुळे आणि प्रशासनातील पकडीमुळे जनसामान्यांमध्ये एक "युगद्रष्टा श्रीमंत महाराजा सयाजीराव गायकवाड" असे नावलौकिक मिळवले. आपल्या हातून प्रजेसाठी नेहमीच कसे चांगले काम करता येईल याचे प्रयत्न महाराजांनी केले.महाराजा सयाजीराव गायकवाड सामाजिक सुधारणांचे जनक होते. इतिहास वाचनाची आवड असल्याकारणाने, प्राचीन कालखंडापासून येथील समाज व्यवस्थेत स्त्रियांचा दर्जा हा दुय्यम स्वरूपाचा आहे असे त्यांना दिसून आले. अनेक

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – IV July – August 2023

OPEN ACCESS Original Research Article

सामाजिक प्रथा व परंपरांमुळे स्त्रियांचे शोषण घडून येत होते आणि घडून येत आहे असे त्यांना जाणवले. हे निर्बंध कमी करण्यासाठी महाराजांना स्त्रियांना स्वातंत्र्य आणि शिक्षणाची मोठी गरज आहे असे वाटले. त्यासाठी आपल्या संस्थानात त्यांनी स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी सरकारद्वारे विविध कायदे करून व स्त्रियांसाठी कल्याणकारी योजना राबवून महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेस चालना दिली. समाजाच्या अनिती कार्यामुळे निर्माण झालेली बंधने तोडण्यावर महाराजा सयाजीरावांचा मोठा भर होता.स्त्रियांचे स्वतंत्र विचार व शिक्षणातूनच त्यांची प्रगती होईल, या विचार सूत्राला केंद्रबिंदू ठेवूनच महाराजांनी शैक्षणिक धोरण राबवलेअसे दिसून येते. त्यांच्या या योगदानाचा थोडक्यात अभ्यास या संशोधन पेपरातून करावयाचा आहे.

**उद्दिष्टे:**

१. महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या स्त्री शिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करणे.

२. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे द्रष्टेपण मांडणे.

३. महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे प्रजाहित विशद करणे.

**गृहीतके:**

१. महाराजा साजराव गायकवाड यांनी स्त्री शिक्षण आणि स्त्री स्वातंत्र्य यावर मोलाचे योगदान दिले आहे.

२. शिक्षण, धर्म. आणि तत्वज्ञान हे महाराजा सयाजीराव गेकवडांचे आवडते क्षेत्र होते.

**संशोधन पद्धत:**

सदर संशोधन पेपर साठी इतिहास संशोधनाच्या वर्णनात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**स्त्री स्वातंत्र्य विषयी विचार**:

फक्त पुरुषांच्या समाज व्यवस्थेत स्त्रियांच्या वाट्याला येणाऱ्या दुय्यम दर्जाच्या भूमिका आणि तिचे रुढी व परंपरा मुळे होणारे शोषण थांबवणे हे अग्रक्रमकाचे आहे असे महाराजांना वाटे. स्त्री-पुरुष दोन्हीही स्वतंत्र विचारांचे आहेत,ते स्वतःभोवती एकमेकांना असे पूरक आहेत,पण परावलंबी नाहीत. असा पुरोगामी विचार त्यांनी मांडला. असा विचार मांडण्यासाठी त्यांनी धर्मग्रंथाचा आधार घेतला. आपल्या पूर्वजांनी 'अर्धनारीनटेश्वराच्या' प्रतीकातून स्त्री-पुरुषांमधली सममूल्यता मान्य केली खरी पण सामाजिक परिस्थिती बघता सद्यस्थितीत तसे आढळून येत नाही असे महाराजांना नेहमीच वाटे. तथागत गौतम बुद्धांनी आपल्या धम्मात स्त्री-पुरुष भेदभाव नाही अशी घोषणाच करून सममूल्यतेची राखण केली होती. स्त्रियांची या गुलामी जोखडीतून मुक्तता व्हावी आणि तिच्या अंगी असलेल्या गुणांचा विकास व्हावा हा तिचा जन्म सिद्ध हक्क आपण तिला दिला पाहिजे. पडदा पद्धती सारख्या परंपरेमुळे बंदिस्त झालेल्या स्त्रीला मुक्तपणे संचार करण्याचे अधिकार किंवा स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. किंबहुना राजकारण, समाजसेवा या क्षेत्रात देखील उपयोगी पडणारे गुण स्त्रियांच्या अंगी आहेत. त्या गुणांचा आधारावरून त्यांना संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. हे त्यांनी आपल्या भाषणातून जनतेस संबोधित करताना आवर्जून सांगितलेले आहे. आपण स्त्रियांचा गुणगौरव करतो. पण मान राखत नाही मान राखणे म्हणजे तरी काय? या प्रश्नाचे उत्तर सुद्धा महाराजांनी त्याकाळी दिलेले आहे. स्त्रियांचा गुणांची व तिच्या योग्यतेची चाचणी करून त्यांच्या विचारांची, इच्छा आकांक्षाची पूर्णपणे जाणीव करून घेणे, या सर्व गोष्टी करणे म्हणजेच स्त्रीचा मान राखणे होईल. पुरुषांच्या

एका हाती सत्तेचा काळ आता संपलेला आहे. लोकशाहीची वेळ आता जवळ आली आहे. स्त्री-पुरुष समानतेची भावना कशी वाढीस येईल याचा संदेश महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी वेळोवेळी आपल्या भाषणाच्या माध्यमातून दिला आहे. स्त्रियांची पिळवणूक थांबवण्यासाठी महाराजांनी वेळोवेळी हुजूर-हुकुम काढल्यांचे पुरावे देखील इतिहासात मिळतात' तसेच बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह कायदा, धर्म स्वातंत्र्याचा कायदा, घटस्फोटाचा कायदा, पडदा पद्धती बंदी, कन्या विक्री बंदी असे विविध कायदे करून स्त्रियांना समाजात योग्य ते स्थान मिळवून देण्याचे कार्य केले.

**बालविवाह प्रतिबंध कायदा:**

सती प्रथा, बालविवाह किंवा मुलीला संपत्तीत कुठलाही अधिकार नाही. यासारखे अनेक नियम धर्मशास्त्राचा आधारे चालत होते. बालविवाह देखील याचा आधारावर चालत होता. मुलीचा कोणताही शारीरिक मानसिक आणि बौद्धिक विकास न पाहता भारतीय समाजात त्याकाळी विवाह करून दिले जात असे. त्याकाळी मोठ्या प्रमाणात जरट विवाह देखील होत होते. या विवाह प्रकारात प्रौढ व्यक्ती सोबत लहान मुलीचे लग्न लावून दिले जात असे. यामुळे मुलीला कधी कधी खूप कमी वयातच वैविध्य पतकरावे लागत असे,आणि शोषणाला बळी पडावे लागत असे. तेव्हा समाजात विधवा पुनर्विवाह प्रचलित नव्हता. यामुळे कमी वयातच मुलींना सामाजिक पिळवणुकीला सामोरे जावे लागत असे. वयात न येता योग्य बौद्धिक आणि शारीरिक वाढीशिवाय प्रजोत्पादनाला सामोरे जावे लागत होते. यामुळे मुलींना मोठ्या प्रमाणात शारीरिक हानीला सामोरे जावे लागत होते. कधीकधी मुली प्रसवाच्या दरम्यान मृत्युमुखी देखील पडत होते. यासारख्या अनेक संकटांना बालविवाह मुळे कमी वयातील मुलींना सामोरे जावे लागत होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा १९०४ मध्ये केला होता. आणि असा कायदा करणारे समकालीन भारतात ते पहिलेच राजा होते. महाराज आपला भाषणात म्हणतात " पुढच्या पिढीचे आणि जीवनमान वाढवण्यासाठी त्यांची शारीरिक आणि बौद्धिक क्षमता वाढवण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक कायदा करणे तातडीचे आहे. बालविवाह कायद्याअंतर्गत कायदेशीर शिक्षेची सुद्धा तरतूद करण्यात आली होती.

१. अज्ञान मुला-मुलींच्या विवाह साठी हा कायदा शिक्षेची तरतूद करतो. अज्ञान म्हणजे १८ वर्षापेक्षा कमी वयाचा पुरुष/मुलगा किंवा १६ वर्षापेक्षा कमी वयाची स्त्री/मुलगी.
२. आठ वर्षे वयापेक्षा कमी मुला मुलींचा विवाह करणे अवैध कायद्याने ठरतो. तसेच शिक्षण संदर्भात फरक स्पष्ट केलेला दिसतो. आठ वर्ष खालील लग्नासाठी एक महिना पर्यंत कैद किंवा पाचशे रुपये दंड किंवा दोन्हीही शिक्षा.

अशा प्रकारची तरतूद करून महाराजांनी आपल्या संस्थानात बालविवाह प्रतिबंधक कायदा १९०४ पासून लागू केला.

**घटस्फोट संबंधीचा कायदा**:

भारतामध्ये विवाहसंस्था पितृसत्ताक आणि ब्राह्मणी वृत्तीचे आहे असे महाराजांचे मानने होते. जातीव्यवस्थेचा मूळ आधारच विवाह संस्था आहे. विवाह संस्थेमुळेच जातीव्यवस्था मजबूत होण्यास मोठ्या प्रमाणात मदत झाली आहे. असो, तो या संशोधनाचा विषय नाही.... महाराजा सयाजीराव गायकवाड हे प्रागतीक विचारांचे राजे होते. त्यांचा हा विचार फक्त पुरुष केंद्री नव्हता, तर त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा आणि मुक्तीचा आशय होता. महाराजांनी आपल्या संस्थानात स्त्रियांना देखील

ISSN–2277- 8721

EIIRJ Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XII, Issues – IV July – August 2023

OPEN ACCESS Original Research Article

घटस्फोटाचा अधिकार दिलेला होता. त्यासाठी त्यांनी तसा कायदा अमलात आणला होता. कायदा स्त्रियांसाठी अतिशय महत्त्वाचा आणि त्यांचा आत्मसन्मान वाढवणारा असा होता. या कायद्याला अनुसरून हिंदू पत्नी खालील तीन मुद्द्यांच्या आधारे होऊ शकत होती.

१. पती नपुंसक असेल तर.
२. त्याला मनोविकार असतील तर.
३. तो जखमा किंवा कुष्ठरोगी दुर्गंधीयुक्त आजाराने पुढे येत असेल तर.

लोकशाहीची मूल्य व स्त्रियांना समाजात सन्मान प्राप्त झाला. स्त्री पुरुष विचारांची देवाण-घेवाण निर्माण होण्यास मोठी मदत झाली.

या कायद्याअंतर्गतच अजून काही महत्त्वाचा तरतुदींचा समावेश करण्यात आला. सात वर्ष पतीचा आठवा ठिकाणा नसणे, संन्यास घेणे, दुसरा धर्म स्वीकारणे, क्रूरपणाचा पुरावा, योग्य उचित कारणाशिवाय एकाने दुसऱ्याला तीन वर्ष आणि त्याहून अधिक काळापासून सोडून देणे, वैवाहिक जबाबदारी पार न पाडणे, त्यामुळे स्त्रीला विवाह या सामाजिक झोपडीतून मुक्त होण्यास मदत झाली. या कायद्यातील तरतुदी फक्त पत्नीलाच लागू होतील असे नव्हते, पतीसाठी सुद्धा घटस्फोट घेण्यासाठी महत्त्वाचा तरतुदी केल्या आहेत. पत्नी लग्नानंतर पती सोडून दुसऱ्या कोणासोबत राहत असेल तर, पत्नीने आपला पती हयात असताना दुसरे लग्न केले तर, दोन्हीपैकी कोणी व्यभीचारी असेल तर, अशा महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश या कायद्यान्वये करण्यात आला होता.

**स्त्री शिक्षण विषयक कार्य:**

स्त्रियांना समतेच्या आणि बौद्धिक विकासाचे मार्ग मोकळे करताना शिक्षणाचाच आधार असतो. स्त्रियांना सुखच द्यायचे नाही, बाहेर पडू द्यायचे नाही, स्त्रिया दुर्बल असतात वगैरे समजूती जुन्या रूढी परंपरा याबद्दल महाराजांची भूमिका स्त्रीस्वातंत्र्यवादी होती. त्यांनी पुरुष शिक्षणाबरोबरच स्त्री शिक्षणाची देखील विशेष काळजी घेतली. राष्ट्राचे अर्धशक्ती असलेल्या स्त्रियांच्या शिक्षणाचा हक्क मान्य केलाच पाहिजे असे त्यांचे विचार होते. १८८५ च्या जाहीरनामा नुसार स्त्रियांच्या क्षमता विकसित करण्यासाठी हा मूलमंत्र घेऊन त्यांनी आपले शैक्षणिकधोरण ठरविले( महाराजा सयाजीराव आणि स्त्री शिक्षण/ मंदा हिंगुराव/ साकेत प्रकाशन औरंगाबाद/२००५/ पृष्ठ तेरा.)

१८८५ मध्ये महाराजांनी स्त्री शिक्षणाचा हुकूम काढला होता. तर संस्थानात मुलींसाठी दोनच शाळांची व्यवस्था होती. महाराजांच्या या धोरणानंतर १९३५ पर्यंत ४०० हून अधिक मुलींच्या शाळा सुरू झाल्या. आणि ९० हजारांहून अधिक मुली शैक्षणिक प्रवाहात येण्यास मदत झाली. १८८५ सालच्या हुकूमात महाराज म्हणतात " युवकांना नैतिक शिक्षण देण्याची जरी आवश्यकता आहे, त्याहून अधिक निकड मुलींना शिक्षण देण्याची आहे" स्त्रियाच जर शिकल्या नाहीत तर उत्तम नागरिक कसे तयार होतील. शिकलेली आईच मुलांवर उत्तम संस्कार करू शकते. शिकलेली स्त्री सहचरीचे नाते यथार्थ करू शकते( हुजूर हुकुम २० ऑगस्ट १८८५) महाराजांनी स्त्री शिक्षणाची गरज लक्षात घेऊन विशेष स्त्री शिक्षण अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला होता. मराठी शारीरिक शिक्षण, व्यायाम शाळा, गृह विज्ञान आणि असे अनेक अभ्यासक्रम, तज्ज्ञांकडून तयार करून घेतले होते. आपला एका भाषणाच्या माध्यमातून महाराज म्हणतात " दुसऱ्या कोणाची आज्ञा पाळत बसण्यापेक्षा

स्वतःच्या अंतकरणाची प्रेरणा प्रमाण वाटली पाहिजे हेच नवयुगाचे लक्षण स्त्रियांनी देखील संपादित केले पाहिजे" व्हरनॅक्युलर एज्युकेशन ऍक्ट १९१३ नुसार शिक्षणासंबंधीच्या कायद्यातील तरतुदींचा अत्यंत स्तुत्य आणि द्रष्टेपणा च्या निर्देशक आहेत. उदाहरणार्थ, प्रकृती उत्तम राहावी म्हणून शारीरिक शिक्षण यावर लक्ष द्यावे, व्यायाम व कसरती शिक्षकाने स्वतःचा देखरेखी खालील करून घ्याव्यात. शिवन कामासाठी नेमलेल्या तज्ञ शिक्षकाने लोकवर्गणीतून शिवणकाम साहित्य उपलब्ध करावीत. नऊ-दहा वर्षापर्यंतच्या मुलींना शिवणकाम सक्तीचे आहे मुख्याध्यापक मुख्याध्यापिकेने भरतकाम कसे उत्तम होईल यात लक्ष द्यावे. सुंदर नमुन्यांचा संग्रह करावा. आठवड्यातून एक दिवस आरोग्य विज्ञानाचा असावा. मातीच्या प्रतिकृती ,शैक्षणिक साहित्य, विज्ञान साहित्य अध्यापनासाठी उपलब्ध करून ठेवावे.

महाराणी गर्ल्स हायस्कूल ही बडोद्यातील पहिली माध्यमिक शाळा होती इसवी सन १९१७ साली मिस नीडहेम यांचे मुख्याध्यापिका म्हणून नेमणूक केली होती. इसवी सन १९३०-३१ मध्ये इंडियन वुमन्स युनिव्हर्सिटीचा अभ्यासक्रम या शाळेला जोडण्यात आला होता. योग्य पद्धतीने स्त्रियांना शिक्षण मिळते की नाही, शाळा महाविद्यालयांना योग्य सोयी सुविधा आहेत की नाही, यासाठी महाराज स्वतः वेळोवेळी भेट देत असत. त्यामध्ये ११ मार्च १९३३ रोजीच्या बडोद्यातील महाराणी चिमणाबाई महिला पाठशाळेच्या विद्यार्थिनींचे पहिले संमेलन, आणि पुणे हुजूरपागीतील मुलींच्या शाळेत भेट व अशा अनेक ठिकाणी भेटी देऊन व आपल्या भाषणातून स्त्रियांच्या उच्चाटनासाठी विचार त्यांनी मांडले.( महाराष्ट्राचे शिल्पकार- महाराजा सयाजीराव गायकवाड/ऐकनाथ पगार/ प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सयानी रोड, प्रभादेवी मुंबई ४०००२५)

स्त्रीशक्ती जागरणाचा हा प्रगतिक दृष्टिकोन आज किती महत्त्वाचा आहे ते आपणास कळून येते. महाराजांचे विचार आज जगात असणाऱ्या स्त्रीवादी चळवळीच्या समतुल्य होते. हे त्यांच्या विचारातून दिसते.

**समारोप:**

इतिहास, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान यांचा व्यासंग केल्यामुळे सयाजीरावांनी बडोदे संस्थानात नवी शिक्षण पद्धती रुजवण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी शिक्षण किती महत्त्वाचे आहे हे त्यांच्या योगदानातून स्पष्ट होते. राजसत्तेचा वापर करून लोकजीवन कसे सुधरवता येते ते आपणास त्यांच्या या योगदानातून कळून येते की ते भविष्यासाठी किती कल्पक होते. नुसती कल्पना नव्हे तर ते आपल्या " बोली तैसा चाले" या कृतीतून स्त्रियांचे शिक्षण आणि समस्येचे निवारण केले असे दिसते. स्त्री एक नाहीतर येणाऱ्या सर्व पिढ्या घडवू शकते याच विचारातून त्यांनी स्त्री शिक्षणावर भर दिलेला दिसतो. त्यांच्या योगदानाच्या माध्यमातून त्यांचा द्रष्टेपणा लक्षात येतो.

**संदर्भ:**

१. महाराजा सयाजीराव गौरवगाथा युगपुरुष- बाबा भांड, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव, महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017.

२. सयाजीराव गायकवाड यांची भाषणे खंड 1 शिक्षण धर्म आणि तत्त्वज्ञान- शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन, प्रकाशक सचिव महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती औरंगाबाद 2017.

३. सयाजीरावांचा शिक्षणाचा अहवाल. शिक्षण आणि शिक्षण सुधारणा भाग १- गो.स. सरदेसाई, अनुवाद विलास गीते, प्रकाशक महाराजा सयाजीराव गायकवाड चरित्र साधने प्रकाशन समिती,115 म. गांधीनगर औरंगाबाद 431005.

४. महाराष्ट्राचे शिल्पकार महाराजा सयाजीराव गायकवाड- एकनाथ पगार, प्रकाशक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला पु. ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई 400025.

५. सयाजीराव महाराजांची सुधारणा योगदान आणि त्यांची समकालीन प्रासंगिकता- संशोधन पेपर प्रा. पाटील अनिल निंबा. SRJIS/BIMONTHLY/773-783/JULLY-AUG, 2015 VOL-3/19

***Cite This Article:***

*** प्रा. सोनजे न. ब. (2023). महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे स्त्री-स्वातंत्र्य आणि स्त्री शिक्षणा विषयी कार्य, Electronic International Interdisciplinary Research Journal**, XII, Issues – IV, July -August, 2023, **137-142.***